


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६४४. वा | रविवार | दि. ०७ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# शिंदे गटाची धाकधूक वाढली, भाजप टाकणार डाव

# प्रतापराव जाधव यांना डच्चू मिळण्याची शक्यता वाढली

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाण्याच्या लोकसभेच्या जागेवरून शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि भाजपत सध्या चांगलीच रस्सीखेच सुरू झाली आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघाची जागाही भाजपला हवी आहे. त्यामुळे या मतदारसंघावर भाजपने लक्ष केंद्रित केले आहे. जिल्ह्यातील शिवसेना खासदार प्रतापराव जाधव यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आगामी लोकसभा निवडणुकीत डच्चू देणार असल्याच्या जोरदार चर्चा सध्या रंगल्या आहेत. राज्यातील आघाडी सरकारमधील शिवसेनेच्या एकनाथ शिंदे यांच्यासह आमदारांनी बंड करत सरकारमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यानंतर आघाडी सरकार कोसळले. त्यानंतर राज्यात शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर झाले. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजप-शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट यांच्यात महायुती कायम राहणार आहे. लोकसभा निवडणुकीच्याअनुषंगाने राज्यात तीनही पक्षांकडून तयारी सुरू झाली आहे. लोकसभा निवडणुकीच्या तयारीत सध्या भाजप आघाडीवर आहे. मिशन ४५ अंतर्गत भाजप निवडणुकीच्या कामाला लागले आहे. पश्चिम विदर्भातील महत्त्वाचा मानला जाणारा आणि शिवसेना शिंदे गटाच्या ताब्यात असलेल्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघावर भाजपचा डोळा आहे. हा मतदारसंघ मिळविण्यासाठी भाजपकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे सध्या लोकसभेचे १३ खासदार आहेत. या तेराही लोकसभा जागांवर भाजपने सर्वेक्षण करून घेतले. त्यात बुलढाण्याची जागा चौथ्या क्रमांकावर जाण्याची शक्यता दाखविली आहे. शिवसेनेचा उमेदवार निवडून येत नसल्याचे सर्वेक्षणातून पुढे आले आहे. त्यामुळे ही जागा शिंदे गटाकडून भाजपला देण्यात यावी, अशी मागणी होत आहे. शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे स्थानिक नेते आपली जागा सोडायला तयार नसल्याने या जागेसाठी सेना आणि भाजपमध्ये चर्चा सुरू झाली आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी असलेले केंद्रीयमंत्री भूपेंद्र यादव पाचव्यांदा मतदारसंघात येत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विश्वासू असलेले भूपेंद्र यादव यांनी प्रवास योजना अंतर्गत यापूर्वी तीन वेळा आणि त्यानंतर आणखी एकदा या मतदारसंघाला भेट दिली आहे. यादव यांनी बुलढाणा, चिखली, खामगाव, शेगाव, जळगाव जामोद, मेहकर या तालुक्यांना भेट दिली. मतदारसंघात मुक्कामी राहत भाजपची जिल्हा सुकाणू समिती, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासमवेत चर्चाही केली. त्यांच्या प्रत्येक भेटीने शिंदे गटाची धाकधूक वाढविली. यादव आता पाचव्यांदा बुलढाणा जिल्ह्यात



येऊन राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा बालेकिल्ला असलेल्या सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेणार आहेत. त्यांच्या या दौऱ्याकडे शिंदे गटाचेही लक्ष आहे. अद्याप महायुतीत जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरलेला नसला तरी लवकरच जागावाटपाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. त्यावेळी बुलढाण्याची जागा भाजपच्या खात्यात जाणार का, हे पाहणे रंजक ठरणार आहे.

# सत्यशोधक चे निर्माता सुनील शेळके प्रेक्षकांच्या भेटीला


## एआरडी सिनेमॉलमध्ये बुलढाणेकरांशी साधणार संवाद

**जनसंचलन/ बुलढाणा**

क्रांतिसूर्य महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जीवना-वर आधारित सत्यशोधक चित्रपटाचे निर्माता सुनिल शेळके ७ जानेवारी रोजी बुलढाण्यातील प्रेक्षकांच्या भेटीला भेट आहेत. सकाळी साडेअकरा वाजता एआरडी सिनेमॉल येथे भेट देऊन ते प्रेक्षकांशी संवाद साधणार आहेत. सत्यशोधक चित्रपट ५ जानेवारी रोजी राज्यभर प्रदर्शित झाला. सर्वत्र या चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पहिल्या दिवशी प्रेक्षकांनी चित्रपटगृहात गर्दी केल्याचे बघायला मिळाले. चित्रपटातील सर्वच कलाकारांनी आपल्या भूमिकांना योग्य न्याय दिला आहे. काळजाला भिडणारे संगीत आणि दर्जेदार अभिनयामुळे चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे.



बुलढाणा येथे पहिल्याच दिवशी चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चित्रपटाचा पहिला शो वसुंधरा पतसंस्थेच्या अध्यक्ष स्वातीताई कन्हेर यांनी महिलांसाठी आयोजित केलेला होता. अनेक महिलांनी सावित्रीमाई फुले यांची वेशभूषा करुन चित्रपट बघितला. अतिशय भावस्पर्शी असा हा चित्रपट पाहताना अनेक वेळा डोळे भरून आल्याचा अनुभव प्रेक्षकांनी सांगितला.



# स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर,उपसाधने पुरवठा योजनेसाठी अर्ज आमंत्रित...

**जनसंचलन/बुलढाणा**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकाच्या सर्व स्वयंसहाय्यता बचत गटांना ३.५० लक्ष रुपयांच्या मर्यादेत ९ ते १८ अश्वआशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधनांचा पुरवठा करण्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या निर्णयानुसार त्यांना अर्थसहाय्य करण्यात येत आहे. त्यासाठी स्वयंसहायता बच गटांनी ३१ जानेवारीपर्यंत अर्ज पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वस्तू स्वरुपात मिळणाऱ्या लाभांचे हस्तांतरण रोख स्वरुपात लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्याबाबतचा नियोजन विभागाने शासन निर्णय दिला आहे. त्याअनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून योजनेमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. संबंधित वस्तूंबाबत वितरण योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ३.५० लाखाच्या मर्यादेत (९० टक्के शासन अनुदान व १० टक्के स्वयंसहाय्यता बचत गट हिस्सा) ९ ते १८ अश्वणशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने (कल्टिवेटर किंवा रोटॅव्हेटर व ट्रेलर) खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य करण्यात येईल. लाभार्थी स्वयंसहाय्यता बचत गटांना अनुज्ञेय असणाऱ्या अनुदानाच्या रकमेपेक्षा उपसाधनांची किंमत जास्त असल्यास कमाल अनुज्ञेय अनुदानाव्यतिरीक्त जादाची रक्कम बचत गटांना स्वत: खर्च करावी लागेल.

या योजनेंतर्गत लाभार्थींची निवड झाल्यानंतर बचत गटाने कृषि आणि शेतकरी कल्याण विभाग, सहकार आणि शेतकरी कल्याण विभागाने निर्धारीत केलेल्या प्रमाणकानुसार मान्यताप्राप्त उत्पादकांकडून मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने शासनाने निर्धारीत केलेल्या किंमतीपर्यंत खरेदी करावीत. स्वयंसहाय्यता बचत गटाने मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी केल्याची पावती सादर केल्यानंतर शासकीय अनुदनाचा ५० टक्के हप्ता आधार संलग्न खात्यावर जमा करण्यात येईल. उर्वरीत ५० टक्के अनुदान मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची आरटीओ कार्यालयाकडे नोंद झाल्यानंतर जमा करण्यात येईल किंवा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंद केल्याचे पुरावे सादर केल्यास १०० टक्के अनदान खात्यात जमा करण्यात येईल.

निर्धारीत केल्याप्रमाणे ९ ते १८ अश्वजशक्तीच्या मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची कमाल किंमत ३.५० लाख ठरविण्यात आली आहे. या रक्कमेपैकी अनुदानाची रक्कम कमाल किंमतीच्या ९० टक्के (३.१५ लाख) राहील. योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकाच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सर्व सदस्य व अध्यक्ष हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत. त्यातील किमान ८० टक्के सदस्य हे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील असावेत. गटाचे अध्यक्ष व सचिव अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील असावेत.



मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमाल मर्यादा ३.५० लाख रुपये राहील तर स्वयंसहाय्यता बचत गटांनी १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर प्रत्यक्ष किंमतीच्या ९० टक्के (कमाल रु. ३.१५ लाख) शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील. तरी इच्छुक अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील स्वयंसहाय्यता बचत गटांनी विहित नमुन्यामध्ये ३१ जानेवारीपर्यंत आपले अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन चिखली रोड, त्रिशरण चौक, बुलढाणा येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी समाज कल्याण विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आपल्या सात्विक भावना या मुळे न्याय व इतर सर्व क्षेत्रात ऊर्जा प्राप्त- ॲड. विजय सावळे

## बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. विजय सावळे यांचा वाढदिवस साजरा



**जनसंचलन/बुलढाणा**

संपूर्ण जिल्हा व राज्यात न्यायदान चे काम अविरत पणे करणारे, आपल्या संयमी व सुस्वभाव यामुळे सर्वांनां सर्वपरिचित असणारे बुलढाणा जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष, तसेच परिवार अर्बनचे तज्ञ् संचालक ॲड. विजय सावळे यांचा वाढदिवस संपूर्ण परिवार अर्बन व सर्व हितचिंतक, शुभचिंतक यांनी मोठ्या उत्साह-ाने साजरा केला. या वेळी सदिच्छा स्वीकारताना सावळे यांनी आपण देत असलेल्या प्रेमाचा मी कायम ऋणी राहील. आपल्या या सात्विक भावना या मुळे न्याय व इतर सर्व क्षेत्रात ऊर्जा प्राप्त होते. अशा भावना व्यक्त केल्या. या वेळी परिवार अर्बन चे कार्यकारी संचालक नितीन कानडजे, गजानन खंडारे, अजय जाधव, आयटी प्रमुख प्रशांत इंगळे, व्यस्थापक सचिन वायाळ, कृष्णा कोरडे, अजय जाधव यांची उपस्थिती होती.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन

**जनसंचलन / बुलढाणा**

सर्वसामान्य नागरिकांना पाच लक्ष रुपयांपर्यंत आरोग्याच्या सुविधा मोफत मिळाव्यात, यासाठी केंद्र शासनाने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य ही अत्यंत महत्वाकांक्षी योजना सुरु केली असून, योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील नागरिकांनी ई-केवायसीसह आभा कार्ड काढून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत असून, जिल्ह्यातील केवायसीचे प्रमाण इतर जिल्ह्यांच्या तुलनेत कमी असल्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी ई-केवायसी करून घ्यावी. बुलढाणा जिल्ह्यात १८ लक्ष ५ हजार ५५० योजनेचा लाभ घेण्यास पात्र लाभार्थी असून, त्यापैकी केवळ ६ लाख १२ हजार १८ लाभार्थ्यांची ई केवायसी पूर्ण झाली आहे. त्यामुळे उर्वरित ११ लक्ष ९३ हजार ५३२ लाभार्थ्यांची ई केवायसी अद्याप पूर्ण झालेली नाही. जिल्ह्यात एकूण उद्दिष्टापैकी ३४ टक्के काम पूर्ण झाले असून, अद्याप ६६ टक्के नागरिकांनी आभा कार्ड काढलेले नाही. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्यासाठी ई केवायसी नोंदणी करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे. जिल्हा प्रशासनाने सामान्य आणि सर्व शासकीय व निमशासकीय तसेच खासगी यंत्रणांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच उर्वरित लाभार्थ्यांनी स्वतः आयुष्मान ॲप मोबाईल गुगल प्ले स्टोअरमधून डाउनलोड करून स्वतःची ई केवायसी पूर्ण करता येणार आहे. तसेच आभा कार्ड काढण्यासाठी या लिंकवर जाता येईल. जिल्ह्यातील महा ई सेवा केंद्रांवर जावूनही हे कार्ड काढता येणार आहे. तसेच नागरिकांना आपले सरकार महा ई सेवा केंद्रांची यादी वर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच आरोग्य कर्मचारी आशा ताई, अंगणवाडी सेविका, आरोग्य सहायक, एएनएमपरिचारिका आणि ग्रामपंचायत केंद्रचालक, खासगी सेतू केंद्रचालकांमार्फत आयुष्मान भारत ई केवायसी करून घेणे आवश्यक आहे. कुटुंबातील सदस्यांना दुर्धर आजार जडल्यास योजनेच्या खाजगी आणि शासकीय अंगीकृत रुग्णालयात १५५६ विविध गंभीर आजारावर पाच लक्ष रुपये किमतीचे विमा संरक्षण केंद्र शासन देत आहे. लाखोंना झाला फायदा तुम्ही कधी करणार ई केवायसी यादीत नाव नसल्यास शिधा पत्रिका आणि आधार कार्ड घेऊन आरोग्य मित्र मदत केंद्रावर भेटणे गरजेचे आहे तसेच गंभीर आजार आणि अडचणीवेळी १८००२३३२२०० यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे समन्वयक डॉ. विवेक सावके यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते अटल आनंदवन घन वनमध्ये वृक्षारोपण...



**जनसचंनल/बुलढाणा**

केंद्रीय कामगार, श्रम, आणि पर्यावरण, वने आणि जलवायू परिवर्तन मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते आज खामगाव तालुक्यातील जनुना येथील अटल आनंदवन घन वन वनक्षेत्र परिसरात मियावाकी पद्धतीने वृक्षारोपण करण्यात आले.

आमदार ॲड आकाश फुंडकर, आमदार डॉ. संजय कुटे, आमदार श्वेताताई महाले, अमरावती विभागाचे वनसंरक्षक अमितकुमार मिश्री, बुलडाण्याच्या उपवनसंरक्षक श्रीमती सरोज गवस, खामगावच्या आरएफओ श्रीमती सारिका घेवंदे, माजी आमदार चैनसुख संचेती, माजी आमदार विजयराज शिंदे उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १८ जून २०२३ रोजी मन की बात कार्यक्रमातून या पद्धतीने वृक्षारोपण करण्याचे वन विभाग आणि नागरिकांना आवाहन केले होते. जनुना बीटमध्ये आज मियावाकी पद्धतीने पिंपळ, कडूनिंब जांभूळ, आंबा आणि मोह आदी वृक्षारोपण करण्यात आले असून, आगामी काळात येथे विविध प्रकारच्या ३० हजार वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

# केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते खामगाव वन परीक्षेत्र अधिकारी कार्यालयाचे लोकार्पण...

**जनसंचलन/बुलढाणा**



केंद्रीय केंद्रीय कामगार, श्रम, आणि पर्यावरण, वने आणि जलवायू परिवर्तन मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते खामगाव येथील वन परीक्षेत्र अधिकारी प्रादेशिक कार्यालयाचे फित कापून लोकार्पण करण्यात आले. आमदार ॲड आकाश फुंडकर, आमदार डॉ. संजय कुटे, आमदार श्रीमती श्वेताताई महाले, अमरावती विभागाचे वनसंरक्षक अमितकुमार मिश्रा, उपवनसंरक्षक (बुलडाणा) श्रीमती सरोज गवस, उपवनसंरक्षक अनिल निमजे, उपवनसंरक्षक (अकोला प्रादेशिक) कुमार स्वामी, विभागीय वनाधिकारी (सामाजिक वनीकरण बुलडाणा) विपुल राठोड, सहायक वनसंरक्षक (बुलडाणा) अभिजित ठाकरे, वन परीक्षेत्र अधिकारी प्रकाश सावळे, किशोर पडोळ, सहायक वनसंरक्षक श्री. पाटील माजी आमदार चैनसुख संचेती, माजी आमदार विजयराज शिंदे उपस्थित होते.

# केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांचा सोमवारी बुलडाणा दौरा...

**जनसंचलन/बुलढाणा**



केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड हे सोमवार (दि.०८) रोजी बुलडाणा जिल्हा दौ-यावर येत आहेत. डॉ. कराड यांचे सोमवारी सकाळी १० वाजता छत्रपती संभाजीनगर येथून बुलडाणा येथे आगमन होईल. येथील जयस्तंभ चौकातील गांधी भवन येथे सकाळी १० वाजता आयोजित विकसित भारत संकल्प यात्रा कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. दुपारी १ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत त्यांची वेळ राखीव असेल. त्यानंतर सायंकाळी ६:३० वाजता ते बुलडाणा येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

# देऊळगाव घुबे परिसरात वन्य प्राणी चा सुळसुळाट वनविभागाचे दुर्लक्ष...

## वन कर्मचारी फक्त नावापुरतेच कर्मचारी झाले दिसेनासे वन्यप्राणी माणसाच्या जिवावर...

**जनसंचलन / चिखली**

चिखली तालुक्यातील देऊळगाव घुबे परिसरात रोही, रानडुक्कर या वन्य प्राण्यांच्या सुळसुळाट वाढला असून बऱ्याच रब्बी हंगामाच्या पिकाची नासाडी होत आहे.या वन्यप्राण्यांपासून पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. देळगाव घुबे व परिसर वन्यप्राणी रोही रानडुक्कर लांडगे कोले इतर प्राण्यापासून शेतकरी वर्ग हा त्रस्त झालेला आहे परंतु वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना याचे कोणतेही सोयर सुतूक नाही वन कर्मचारी या भागांमध्ये कधी फिरकत सुद्धा नाही बऱ्याच लोकांना तर हे सुद्धा माहित नाही की याच्या बंदोबस्तासाठी वन कर्मचारी आहे म्हणून आज शेतकरी निसर्गाच्य आडमुठे पणामुळे मोडकळीस आलेला आहे निसर्गाच्या आसमानी आणि सुलतानी संकटामुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबर ठेवून टेपला आलेला असतानाच या आलेल्या मालाचे नुकसान होताना उघड्या डोळ्यांनी दिसत आहे त्यामुळे सुद्धा शेतकरी हातबल झालेला आहे देऊळगाव घुबे परिसरामध्ये गिटीच्या खदानी सुद्धा भरपूर आहे यामध्ये काही प्राण्यांचा मृत्यू सुद्धा झालेला आहे परंतु याची खबर सुद्धा वना कर्मचाऱ्यांना लागत नाही या भागामध्ये बऱ्याच मोठ्या खदानी खोदून ठेवलेले आहे त्यांना सुद्धा कोणत्याही प्रकारची वन्यप्राणी त्यामध्ये जाऊ नये म्हणून कोणत्याही संरक्षण भिंती सुद्धा लावलेल्या नाहीत त्यामध्ये सुद्धा याआधी भरपूर वन्यप्राणी पडून जीवित हानी झालेली आहे याची माहिती सुद्धा वनविभागाच्या कर्मचारी यांना नाही बरेच लोकांना वन्य प्राण्यापासून इजा झालेली आहे परंतु याकडे सुद्धा वना कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष झालेले आहे अशी घटना या अगोदर जिल्हात घडल्या आहेत. परंतु झालेल्या पिकांची नुकसान कोण भरपाई देणार अशे शेतकरी विचारतात? देऊळगाव घुबे येथील शेतकरी रात्री येवता,मलगी, देऊळगाव घुबे या ग्रामीण भागातील शेतकरी रोज रात्री रोही , रानडुक्कर त्यांच्या पिकाचं नुकसान होऊ नये म्हणून शेता जवळील शेतकरी एकत्र येऊन रात्री झोपण्याकरीता शेतात जातात.कारण हे वन्य प्राणी कधी कधी माणसाचा अंगावर येतात. अगोदर शेतकऱ्याच्या हाता तोंडाशी आलेल पीक अवकाळी पावसाने आणि धुई ने पीक मातीमोल झाले.मात्र उरलेले पीक असून त्यासाठी राहणा करण्यासाठी थंडी मध्ये जीव धोक्यात घालून शेतात जात आहे.दोन ते तीन कळप रोज सकाळी रोही शेतात दिसतात.सध्या जंगली प्राणी मुळे त्रासा ल शेतकऱ्याला त्रास सहन करावा लागत आहेत.



# शिंदे, फडणवीस, पवारांच्या बंगल्यातील खाण्याचं बील ६.५ कोटींचं बील आलं समोर...

**वृत्तसंस्था/ मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या सरकारी निवासस्थानी येणाऱ्या लोकांच्या खानपान सेवांसाठी वर्षभरात करण्यात येणाऱ्या खर्चाबाबतची माहिती समोर आली आहे. दहा महिन्यांपूर्वी या दोन सरकारी बंगल्यावर मान्यवर अतिथींच्या खानपान सेवांसाठी पुरवठादार निश्चित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निवासस्थानासाठी आता वार्षिक दीड कोटी रुपयांवर एका केटरची नियुक्ती केली आहे. यासोबत देवेंद्र फडणवीस यांच्या बंगल्यासाठी सुमारे दीड कोटी रुपये आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्या बंगल्यासाठी साडेतीन कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. काही महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा येथील पाहुणचारावर सरकारला कोट्यवधी रुपये खर्च करत असल्याची टीका विरोधकांकडून केली आहे. राज्यात शिंदे आणि फडणवीस सरकार आल्यानंतर मंत्रालय आणि सरकारी निवासस्थानांवर गर्दी होत होती. याचा सरकारी तिजोरीवर परिणाम होत असल्याचे म्हटलं जात होतं. आरटीआयच्या माहितीनुसार, सरकार स्थापन झाल्यापासूनच्या चार महिन्यांत मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी केटरिंग सेवेवर २ कोटी ३८ लाख रुपये खर्च करण्यात आल्याचे समोर आलं होतं.

राज्य सरकारने एप्रिल २०२५ पर्यंत देवगिरी या अजित पवारांच्या शासकीय निवासस्थानासाठी छत्रधारी केटरर्सची नियुक्ती केली आहे. त्यामुळे आता वर्षा, सागर आणि देवगिरी या तीनही बंगल्यांवर खानपानाचा एकूण खर्च वर्षाला सुमारे ६.५ कोटी रुपये असणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे एप्रिल २०२३ मध्ये विरोधात असताना अजित पवार यांनीच मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर केवळ चार महिन्यात खानपानावर तब्बल २.६८ कोटी रुपयांवर पोहोचल्याचे म्हटलं होतं.गेल्या वर्षी, राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने मुख्यमंत्री शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यासाठी छत्रधारी केटरर्स आणि श्री सुख सागर हॉस्पिटॅलिटीची नियुक्ती करणारा जीआर जारी केला होता. त्यानंतर आता अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावर देखील छत्रधारी केटरर्स मार्फत पाहुणचार केला जाणार आहे. देवगिरी बंगल्यावर या केटरर्समार्फत ४४ वस्तू पुरवल्या जाणार आहेत ज्यात गरम आणि थंड पेये आणि स्नॅक्सचा समावेश आहे. यामध्ये महाराष्ट्रीयन कचोरी (१५ रुपये), साबुदाणा वडा (१५ रुपये), दही वडा (१५ रुपये), वडा सांभर आणि टोमॅटो ऑम्लेट



(२८ रुपये), मसाला डोसा (२० रुपये) आणि व्हेज आणि चिकन सँडविच (१८-२० रुपये) मिळणार आहे. तसेच शाकाहारी आणि मांसाहारी थाळी (७५ आणि ९८ रुपये), शाकाहारी आणि मांसाहारी चिकन आणि मटण बिर्याणी (२५ आणि ३५ रुपये) आणि बुफे (१६० रुपये) हे पदार्थ देखील पुरवले जाणार आहेत. दरम्यान, वर्षा आणि सागर बंगल्यावर येथे समान दर लागू आहेत. तसेच जर खाद्यपदार्थ मान्य केलेल्या दरांव्यतिरिक्त इतर दराने विकले गेले, तर त्याचे बिल मंजूर केले जाणार नाही, असे जीआरमध्ये म्हटलं होतं.

---

# पारंपरिक कारागिरांनी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचा लाभ घ्यावा...

**जनसंचलन/बुलढाणा**

औजारे व साधने यांचा वापर करुन व हातांनी काम करणाऱ्या पारंपरिक कारागीर आणि हस्तकलेच्या लोकांना ओळख प्राप्त करुन देण्यासाठी तसेच त्यांना सर्वांगिण आधार देवून त्यांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना मंजूर केली आहे. जिल्ह्यात योजनेंतर्गत नोंदणी सुरु झाली असून जास्तीत जास्त पारंपरिक कारागिरांनी जवळच्या सी.एस.सी सेंटरला जावून नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी केले आहे.

पारंपरिक कारागिरांना विश्वकर्मा म्हणून मान्यता देणे, कौशल्य वाढविण्यासाठी कौशल्य वृध्दी करणे, व्यवसायाच्या संबंधित आणि योग्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देणे, चांगल्या आणि आधुनिक साधनांसाठी सहाय्य प्रदान करणे, ब्रँड प्रमोशन आणि मार्केट लिंकेजसाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे ही योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. कौशल्य पडताळणी नंतर पाच सात दिवस मूलभूत प्रशिक्षण, इच्छूक उमेदवारास पंधरा दिवस प्रगत प्रशिक्षण, दररोज ५०० रुपये विद्यावेतन, टुलकिट प्रोत्साहन १५ हजार अनुदान, तारणमुक्त व्यवसायिकता विकास कर्ज १लाख रुपये आणि २ लाख रुपये सवलतीचा व्याज दर एमएसएमईद्वारे ८ टक्के व्याज सवलत मर्यादेसह लाभार्थीकडून ५ टक्के व्याज. या कर्जाची क्रेडिट गॅरंटी फि केंद्र सरकार उचलेल. डिजिटल व्यवहारासाठी प्रोत्साहन जास्तीत जास्त १०० व्यवहारांसाठी प्रती व्यवहार १ रुपयांप्रमाणे राहील. विपणन समर्थन नॅशनल कमिटी फॉर मार्केटिंग गुणवत्ता प्रमाणपत्र, ई-फामर्स लिंकेज, व्यापार मेळावे जाहिरात, प्रसिद्धी आणि इतर विपणन सारख्या सेवा प्रदान करण्यात येतील हे लाभ नोंदणीकृत कारागिरांना मिळणार आहेत.




योजनेसाठी पात्र कारागीर व्यवसाय-कुंभार, बोट निर्माता, लोहार, हॅमर अँड टुलकिट मेकर, कुलपे बनविणारे, मूर्तीकार, स्टोन ब्रेकर, सोनार, सुतार, मोची, गवंडी राजमिस्त्री, मॅट झाडू निर्माता, नाव्ही, बाहुली आणि खेळणी निर्माता, फुलमाला निर्माता, परीट, शिंपी, मासेमारी जाळी बनविणारा अशा १५ व्यवसायातील कारागिरांना योजनेचा लाभ घेता येईल. योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी अर्ज भरण्यासाठी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, अरुणोदय बिल्डींग, सुवर्ण नगर शिवाजी हायस्कूलजवळ, बुलडाणा येथे संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# रूम्हना येथे ग्राम संघाची बैठक संपन्न...



**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील रूम्हना येथे महिला ग्राम संघाची बैठक ग्रामपंचायत कार्यालयात संपन्न झाली, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ग्रामपंचायत सदस्य विमल कायंदे होत्या, उपस्थिती म्हणून ग्रामपंचायत सदस्य प्राचार्य शिवराज कायंदे, सचिव विनोद सातपुते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका अभियान व्यवस्थापक शिवहरि झोटे, ईश्वर दळवी उपस्थित होते. यावेळी झोपे यांनी उपस्थित सर्व बचत गटांच्या महिलांना बचत गटाचे महत्त्व, फिरता निधी, कर्जाचा उपयोग कसा करायचा, वेळेची व पैशाची बचत कशी करायची, त्याचप्रमाणे बचत गटाच्या माध्यमातून नवीन उद्योग सुरू करण्यासाठी बचत गटांनी कसे प्रयत्न करावेत, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले, आजची बचत ही उद्या भविष्याची फार मोठी मदत ठरू शकते, यासाठी प्रत्येकाने बचत करणे काळाची गरज आहे असे त्यांनी सांगितले, तसेच प्रत्येक बचत गटातील महिलांनी स्वतः चा विमा सुद्धा काढून घ्यावा हे त्यांनी यावेळी सांगितले, यावेळी बैठकीला माजी सरपंच धनश्री कायंदे, ज्योती कायंदे, गोकर्ण पाखरे यांच्यासह सर्व बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार प्रदर्शन ग्रामसेवक विनोद सातपुते यांनी केले

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याला वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

| | | |
|---|---|---|
| 8x8 cm<br>1 Month=5000/-<br>15 Day=3500/-<br>7 Day=2000/-<br>Hight 8 cm<br>Width 8 cm | 5x8 cm<br>1 Month=3500/-<br>15 Day=2200/-<br>7 Day=1500/-<br>Hight 5 cm<br>Width 8 cm | 5x8 cm<br>1 Month=3500/-<br>15 Day=2200/-<br>7 Day=1500/-<br>Hight 5 cm<br>Width 23 cm |

एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

One Day
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

| | | |
|---|---|---|
| 2600/-<br>Hight 12 cm<br>Width 12 cm | 1800/-<br>Hight 8 cm<br>Width 10 cm | 1300/-<br>Hight 8 cm<br>Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, डी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com